राज्यातील पात्र लाभार्थ्यांना वाटप करावयाच्या
साखरेचे प्रमाण आणि दर ठरविण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. साखर १११७/ प्र.क्र. ६५/ नापु १९
मादाम कामा मार्ग, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १५ सप्टेंबर, २०१७.

पहावे:- १. शासन निर्णय क्र. १११६/ प्र.क्र. ६९/ नापु १९, दि. ११-०४- २०१७
२. शासन शुद्धिपत्रक क्र.१११६/ प्र.क्र. ६९/ नापु १९, दि. १५-०४- २०१७
३. केंद्र शासनाचे दि. १२-०५-२०१७ रोजीचे पत्र.
४. शासन निर्णय क्र. १११७/ प्र.क्र. ६५/ नापु १९, दि. १४ -०६- २०१७

प्रस्तावना

राज्यातील पात्र लाभार्थ्यांना नियंत्रित दरात साखर वितरीत करण्याची योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक अंत्योदय आणि बी.पी.एल. योजना कार्डधारक व्यक्तीला दरमहा ५०० ग्रॅम याप्रमाणे साखर वितरीत करण्यात येत होती. सदर साखर लाभार्थ्यांना रु. १५/- प्रति किलो या दराने वितरीत करण्यात येत होती.

२. नियंत्रित दराने वितरीत करण्यात येत असलेली साखर खुल्या बाजारातून खरेदी करण्यात येत आहे. नियंत्रित दराने वितरीत करावयाच्या साखरेसाठी केंद्र शासनाकडून रु.१८.५० पैसे प्रति किलो एवढे अनुदान मिळते. त्यापुढील साखरेचा दर निश्चित करावयाचे अधिकार केंद्र शासनाने राज्य शासनाला दिले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने साखरेचा विक्रीचा दर रु.१५ प्रतिकिलो असा निश्चित केलेला आहे.

३. केंद्र शासनाने त्यांच्या दि १२ मे २०१७ रोजीच्या पत्रान्वये, फक्त अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांनाच वितरित करण्यात येणा-या साखरेवर रु. १८.५० प्रति किलो अनुदान देण्यात येईल तसेच वाटप करण्यात येणा-या साखरेचे प्रमाण प्रति व्यक्ति ५०० ग्रॅम वरुन प्रति कुटुंब १ किलो करण्यात येईल असे कळविले आहे.

४. केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील पात्र लाभार्थ्यांना नियंत्रित दराने पुरवण्यात येणा-या साखरेचे प्रमाण आणि दर सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासाठी दि. २२ मे २०१७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या विषयावर निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार दि. २७ जून २०१७ मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>

(१) जून २०१७ या महिन्यापासून राज्यातील अंत्योदय लाभार्थ्यांना प्रति कुटूंब १ किलो दरमहा या प्रमाणे साखर वितरीत करण्यात यावी.

(२) जून २०१७ या महिन्यापासून साखरेचा विक्रीचा दर रु.१५ ऐवजी रु.२० प्रति किलो करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्र २०१७०९१५१२११३३२५०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2017.09.15 12:01:22 +05'30'

(स.श्री. सुपे)
उपसचिव ,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री , अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव.
६. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव.
७. मा. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.
८. मा.प्रधान सचिव, वित्त विभाग.
९. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
१०.महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) , महाराष्ट्र, मुंबई
११.महालेखापाल-२ (लेखा परिक्षा) , महाराष्ट्र, नागपूर
१२.महालेखापाल-१ (लेखा परिक्षा) , महाराष्ट्र, मुंबई
१३.महालेखापाल-२ (लेखा परिक्षा) , महाराष्ट्र, नागपूर
१४.सर्व विभागीय आयुक्त,
१५.सर्व जिल्हाधिकारी,
१६.नियंत्रक, वैधमापनशास्त्र, मुंबई,
१७.नियंत्रक, शिधावाटप, मुंबई,
१८. संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई,
१९.उप संचालक, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
२०.वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई

२१.सर्व उपायुक्त पुरवठा,
२२.सर्व अपर जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळता),
२३.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
२४.अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे/नागपूर/सोलापूर,
२५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९.विभागातील सर्व अधिकारी (सचिव वगळता),
३०. प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई,
३१.वित्त विभाग (व्यय-४/ विनियम कार्यासन),
३२.माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३३.निवड नस्ती, नापु-१९.